
# स्वाध्याय माला



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. १५३८
BVBK-0401537

या पुस्तिकांसाठी उपयोगात आणलेले **संदर्भ-ग्रंथ**

**मध्ययुगीन चरित्रकोश**--ले. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव; **नवनीत**-- ले. नारायण बाळकृष्ण गोडबोले; **आर्यांचे सण**-- ले.' ऋग्वेदी'; **जिवंत व्रतोत्सव**-- ले. काका कालेलकर; **संस्कृति समवाय** -- ले. वत्सला भाटे. **स्वामी विवेकानंद**-- ले. त्र्यं. ग. बापट; **सहा थोर पुरुष**-- ले. न. र. फाटक आणि अनेक लेखकांनी लिहिलेली चरित्रे.

स्वा ध्या य मा ला

**संपादक-मंडळ**

डॉ. ग. श्री. खैर, एम्. ए., पीएच्. डी.

श्री. दि. दा. गांगल, एम्. एस्सी.

प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्. ए.

श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी. एस्सी.

श्री. उ. र. सेवलेकर, बी. ए. (ऑ.), एम्. ईडी.

प्रकाशक : डॉ. गं. श्री. कोशे,
अ. वि. गृह प्रकाशनाकरिता,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

मुद्रक : दि. दा. गांगल,
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

आवृत्ती पहिली : १९५७
आवृत्ती दुसरी : १९६५

© प्रकाशकाधीन

७५/७८

स्वाध्यायमाला : पुष्प २०१ वे

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# चैत्र मास

अ. वि. गृ. ठाणे, ग्रंथालय शाखा.
दाखल क्र. ७५३८ क्र. ७५१९/७
विषय क्र.

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर,
मुंबई

★

BVBK-0401537

किमत ७५ पैसे

[redacted]

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २.

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात. त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना व प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकांच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी देण्यासाठी; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रे, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.

मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा मालेचा हेतू आहे.

म. ग्रं. सं. ठाणे.
क्र. १५३८ १५।३।८७
विषय

# चैत्र मास



## चैत्र नाव का पडले ?

चैत्र महिन्याला चैत्र हे नाव चित्रा नक्षत्रावरून पडले आहे. चित्रा नक्षत्र असलेली पौर्णिमा ती चैत्री पौर्णिमा आणि ज्या महिन्यात चैत्री येते तो चैत्र महिना असे नाव रूढ झाले.

चैत्र हा शब्द चित्र या शब्दावरून तयार करण्यात आला, असे म्हटले तरी ते ठीकच होईल. कारण चित्र या संस्कृत शब्दाचा अर्थ विविध असा आहे आणि चैत्र महिन्यात निसर्गसृष्टी विविध रंगांनी नटलेली असतेच ना ? वसंत ऋतूचा आरंभ झाल्यामुळे चहूकडे हिरवेगार दिसत असते. पण त्या हिरव्या रंगांतसुद्धा किती तऱ्हेतऱ्हेच्या छटा असतात ! अन् ह्या सगळ्याच छटा डोळ्यांना भारी सुखकर वाटतात; म्हणूनच नुसते हिरवे म्हणण्याऐवजी त्या हिरव्या रंगाचा डोळ्यांना गारवा देणारा गुण उठून दिसावा म्हणून आपण हिरवेगार असे म्हणतो.

आता अशा या नयनरम्य चैत्र महिन्यात कोणकोणते सण येतात ते आपण पाहू या.

## वर्षारंभ-दिन

ब्रह्मांड पुराणात असे सांगितले आहे की, प्रथम ब्रह्म-देवाने जग उपन्न केले ते चैत्र शुद्ध प्रतिपदेला.

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे आपल्या नव्या वर्षाचा पहिला दिवस ! वर्षाचा आरंभ ही जणू नव्या वर्षाची सकाळ असते. आणि सकाळच्या प्रहरी जसा उत्साह वाटतो तसा ह्या चैत्री प्रतिपदेच्या दिवशी आपल्याला उत्साह वाटतो ! कारण ह्याच सुमाराला वसंत ऋतूचाही प्रारंभ होतो अन् निसर्गाची प्रफुल्लित शोभा ठायी ठायी पहाताना आपलेही मन साहजिकच उल्हसित होते नि त्यामुळे आपल्या शरीरालाही फार उत्साह वाटतो !

आजच्या दिवशी मनाशी नवे व चांगले संकल्प करून ते प्रयत्नपूर्वक पार पाडण्यास सुरुवात करावयाची असते. ह्यासाठी आजपासून रोजनिशी लिहिण्यास सुरुवात करा. तीत आपल्या रोजच्या बऱ्यावाईट कामगिरीची, अनुभवांची नोंद करीत जा. ह्यामुळे स्वतःच्या आचारविचारांवर तुमची देखरेख राहील. आणि आपल्या हातून घडलेल्या सत्कृत्यांची जाणीव राहिल्यामुळे मनाला उमेद वाटेल नि दुष्कृत्यांबद्दल वेळीच पश्चात्ताप वाटून चुकीची तत्काळ दुरुस्ती करण्याची सवय मनाला जडेल.

ह्याचसाठी वर्षाच्या ह्या पहिल्या दिवशी प्रत्येकाने आधी मागच्या वर्षाचे सिंहावलोकन करावयाला हवे ! सिंहावलोकन म्हणजे सिंहाप्रमाणे मागे वळून पहाणे. भर वेगाने उड्या टाकीत धावता धावता सिंह मध्येच थबकून आपण कुठपर्यंत आलो हे पहातो; त्याप्रमाणे पहाणे होय. आपली प्रगती व्हावी अशी इच्छा


बाळगणाऱ्या प्रत्येक लहानथोर व्यक्तीने स्वतःला अशी सवय लावून घेणे आवश्यक आहे. कारण, त्यामुळे आपण कोठे आहोत ते आपल्याला कळून येते आणि नव्या वर्षाचे बेत आखणे सोयीचे होते.

पण असे बेत मात्र बेतानेच आखा हं ! आपल्याला झेपतील असे संकल्प करणेच शहाणपणाचे ! नाहीपेक्षा 'उचलली जीभ नि लावली टाळ्याला' किंवा उगीचच 'तोंडची वाफ दवडली' अशी रास्त टीका करावयाला आपणच कारण करून दिल्यासारखे होईल.

आधी विचार, मग त्याचा उच्चार नि शेवटी आचार ऊर्फ कृती ! तेव्हा आपला विचार, उच्चार व आचार ह्यांत व्यवस्थित मेळ हवा. उगीच भाराभर नवे बेत उच्चारून दाखवावयाचे; पण त्यातील फार तर एखादा बेत प्रत्यक्ष आचरणात आणावयाचा ह्यात कसला मोठेपणा ? त्यापेक्षा आपल्या हातून नीट पार पडू शकतील असे मोजकेच बेत करावे नि ते व्यवस्थित पार पाडावे. म्हणजे पुढल्या वर्षाच्या पहिल्या दिवशी सिंहावलोकन करताना जमेच्या सदरात थोडीफार भरीव कामगिरी तुम्ही घालू शकाल नि त्यामुळे तुमचा आनंद व उत्साह वाढेल.

**साडेतीन मुहूर्त**

चैत्र शुद्ध प्रतिपदा हा वर्षाचा पहिला दिवस तर आहेच; पण साडेतीन मुहूर्तांतला मुहूर्त आहे तो. हे साडेतीन मुहूर्त ध्यानात आहेत का तुमच्या ? विसरलात ? आता तुमच्या रोजनिशीत नोंदच करून ठेवा बरं. घोकंपट्टीने पाठ होते हे तर खरेच. पण घोकलेले लिहून काढले की ते आपल्या स्मरणात अगदी घट्ट बसते. तेव्हा घ्या लिहून रोजनिशीत. साडेतीन मुहूर्तः—चैत्र शुद्ध



प्रतिपदा ऊर्फ गुढीपाडवा हा एक मुहूर्त, वैशाख शुद्ध तृतीया - अक्षय्यतृतीया - हा अर्धा मुहूर्त, आश्विन शुद्ध दशमी - विजयादशमी, ऊर्फ दसरा हा एक मुहूर्त आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा ऊर्फ बळीपाडवा हा एक मुहूर्त. हे सर्व मिळून साडेतीन मुहूर्त होतात.

तेव्हा अशा ह्या सुमुहूर्ता-वर रोजनिशी लिहिण्याचा ( नुसती बाळगण्याचा नव्हे हं ) प्रारंभ करणे अत्यंत योग्य आहे !

पहिलाच सण म्हणजे गुढीपाडवा ऊर्फ चैत्र शुद्ध प्रतिपदा ! ह्या दिवशी पहाटे उठून आपण गुढी उभारतो व तिची पूजा करतो. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण गुढीशेजारी तिरंगी झेंडाही लावतो. आणि ते योग्यच आहे. कारण हा स्वातंत्र्यदिनही आहे ! ह्याच दिवशी श्रीरामचंद्रानं

प्राचीन काली वालीच्या जुलुमी सत्तेतून दक्षिणेकडील प्रदेशाला सोडविले होते. तेव्हा ह्या दिवशी आपल्या स्वतंत्र भारताचा झेंडा आपण उभारला तर दुधात साखर पडल्यागत होईल !

पाडव्याच्या दिवशी पक्वान्नांचे गोड जेवण आपण जेवतो. पण त्यापूर्वी कडुलिंबाच्या पाल्याची कडू चटणी चाखीत असतो.



कडुलिंबाचा पाला औषधी व आरोग्यदायी तर असतोच. पण आधी कडू व मग गोड ह्या न्यायाने आरंभी तोंड कडू केले की, वर्षभर सारा आनंदीआनंद होईल, असे सुचविण्यासाठी तर आपल्या चतुर पूर्वजांनी ही कडुलिंबाची चटणी पाडव्याच्या दिवशी चाखण्याची प्रथा पाडली नसेल ना ?

इंग्रज लोक त्यांच्या नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी एकमेकांचे शुभचिंतन करतात, आणि त्यांचे अनुकरण करण्याची सवय झाल्यामुळे आजकाल आपणही जानेवारीच्या पहिल्या तारखेला अशा रीतीने शुभचिंतन करतो. शुभचिंतनाची ही रीत उत्तम आहे. अन् चांगल्या गोष्टींचे अनुकरण करणे केव्हाही स्तुत्य आहे. तेव्हा इंग्रजांची ही पद्धत आपण अवश्य पाळावी. मात्र जानेवारीच्या पहिल्या तारखेऐवजी आपल्या वर्षाच्या पहिल्या दिवशी, गुढीपाडव्याच्या दिवशी, ती पाळावी. इंग्रज लोक इतकी वर्षे हिंदुस्थानात होते, पण त्यांनी स्वतःची संस्कृती सोडली का ? मग आपण आपली संस्कृती का सोडावयाची ? आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगण्याच्या त्यांच्या ह्या गुणाचे तरी अनुकरण करू या. आणि

ह्या वर्षप्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर एकमेकांची प्रेमाने भेट घेऊन शुभेच्छा प्रकट करू या. आपल्या नातलगांच्या किंवा शेजाऱ्यांच्या काही अडचणी असतील त्या समजून घेऊन त्यांना मदत देऊ या.

अशा रीतीने नव्या वर्षाचा प्रारंभ आपण केला तर खात्रीने ते सबंध वर्ष सुखासमाधानात जाईल !

आपण केलेली चांगली गोष्ट, सत्कृत्य, हे व्याजी लावलेल्या रकमेसारखे असते. व्याजी लावलेली रक्कम ज्याप्रमाणे वाढत जाते नि शेवटी आपल्या पदरात भरपूर पैसे पडतात त्याप्रमाणे आपण केलेले सत्कृत्य ईश्वराकडे रूजू होते आणि त्याचा मोबदला केव्हा ना केव्हा तरी आपल्याला मिळतो !

**वसन्तगौरीचा उत्सव**

चैत्र महिन्यातील वसंतऋतूमुळे वसंतगौरीचा उत्सव व हळद-कुंकू करण्याचा प्रघात पडला आहे. अन् ह्यामुळे आनंदाला बहर



येतो. चैत्र शुद्ध तृतीयेच्या दिवशी गौरी माहेरी येते व महिनाभर

राहून वैशाख शुद्ध तृतीयेच्या दिवशी—अक्षय्यतृतीयेच्या दिवशी—ती सासरी परत जाते अशी कल्पना आहे. त्यामुळे ह्या महिन्याभरात घरोघरी हळदीकुंकवाची गंमत चालू असते.

हळदकुंकवाच्या ह्या प्रघातामुळे स्त्रियांमधील स्नेहभाव वाढतो. शेजारणीशी वर्षभर अबोला असला तरी राधाबाई तिला आवर्जून हळदकुंकवाचे आमंत्रण धाडतात. नि ती शेजारीणही ते मानून अवश्य येते ! अशा रीतीने हळदकुंकवाच्या समारंभापायी अबोले मिटतात, रुसवेफुगवे सुटतात.

अन् गौरीच्या पुढ्यात आरास करताना तर स्त्रियांच्या नि मुलींच्या कलात्मकतेला व उत्साहाला भारी स्फूर्ती येते. अन् मुलांचीही तशी चंगळ असते. त्यांनाही डाळ, साखरफुटाणे नि थंडगार पन्हे मिळते.

कच्च्या कैऱ्यांच्या पन्ह्याची ती आंबट-गोड चव घेताना आता लौकरच मिळणाऱ्या, पिकलेल्या हापूसपायरी आंब्यांची मधुर चव तुमच्या जिभेवर हुळहुळते ना हळूच ? हा अपेक्षेचा आनंदही मोठा गमतीचा असतो !

**जुने स्वरूप ठेवा**

मघा आपली भारतीय संस्कृती टिकविण्याबद्दल मी सांगितले ते पटले ना तुम्हांला ? मग त्याबद्दल आणखी थोडे ऐका हं. अशा हळदकुंकवाच्या प्रसंगी मुलींनी गोल पातळाएवजी नऊवारी लुगडे नेसावे. त्यामुळे अशा समारंभांचे जुने स्वरूप अभंग राहते. आणि आपली जुनी वेषपद्धत मुलींना परिचित होते. अर्थात्च मुलीं-बरोबर मुलींच्या मातांनीही असल्या प्रसंगी वासनातली नऊवारी लुगडी काढावयाला हवीत. बनारसी शालू, कोइमतुरी पातळे किंवा

पैठण्या नेसावयाला अगदी योग्य प्रसंग आहेत हे ! नि त्यामुळे आपली जुनी संस्कृती टिकविण्याचे श्रेयही मिळेल !

मुलींनो, आचरणात आणाल का माझी ही सूचना ? ह्यात लाजिरवाणे किंवा कमीपणाचे काऽही नाही ! सुधारणेच्या शिखरावर असलेल्या अनेक पाश्चात्य राष्ट्रांतील लोक अशाच रीतीने आपली जुनी परंपरा किती आवडीने पाळतात. हॉलंड व फ्रान्स देशांतील मुली व मुलगे आपल्या आजी, पणजीचे व आज्यापणज्याचे जुने कपडे घालून आपले राष्ट्रीय सण साजरे करतात. तेव्हा तुम्हीही अशा सणाकाठी जुना पेहराव करण्यात कसला कमीपणा आहे ?

कर्मठ लोकांप्रमाणे तुम्ही ‘ जुने ते सोने ’ म्हणा असे नाही मी तुम्हाला सांगत ; पण निव्वळ ‘ नवे ते हवे ’ असा दुराग्रहही धरू नका. ह्या दोन्हीमधील सुवर्णमध्य साधण्यासाठी जुन्यातील चांगले व नव्यातील चांगले निवडून काढून त्याची सांगड घाला म्हणजे आपल्या मायभूमीचा खरा उद्धार होईल !

**श्रीरामनवमी**

आता चैत्र महिन्यातील दुसरा सण म्हणजे श्रीरामनवमी ! चैत्र शुद्ध नवमीच्या माध्यान्ही श्रीरामाचा जन्म झाला होता. श्रीरामचंद्राची व त्याबरोबरच रामायणाची कथा तुम्हाला ठाऊक असेलच.

पित्याने दिलेल्या वचनाचे पालन करण्यासाठी प्रभू रामचंद्र चौदा वर्षे वनवासाला गेले. आपल्या पित्याबद्दल व सावत्र आई कैकेयी हिच्याबद्दल त्यांच्या मनात केवढा आदर होता ते ह्यावरून कळून येते. वडील माणसांची आज्ञा कितीही त्रासदायक

वाटली तरी ती निमूटपणे पाळणे आपले कर्तव्य आहे हा बोध रामचंद्राच्या जीवनावरून आपण घ्यावयाला हवा! शौर्य, धैर्य, सात्त्विकता, तत्त्वनिष्ठा, त्याग व प्रेम इत्यादी अनेक गुणांमुळे रामचंद्राला आपण ईश्वराचे अवतार मानतो.

श्रीरामचंद्राच्या सद्वर्तनाची महती एवढी होती की, त्याच्या राजवटीला समर्पक असे जे रामराज्य हे नाव दिले होते तो शब्द आजही अत्युत्तम राज्यव्यवस्थेचा दर्शक होऊन राहिला आहे! 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' असे रामदासांनी म्हटले आहे ते अगदी खरे आहे! आता मी थोडक्यात तुम्हांला श्रीरामाच्या जीवनकथेतील ठळक विशेष सांगते.



ऐन तारुण्यात सावत्र आईच्या इच्छेला मान देण्यासाठी रामाने सिंहासनाचा त्याग करून वनवास पत्करला.

ते वनवासी जीवनही प्रेमळ पत्नीच्या व भावाच्या सहवासात आनंदाचेच वाटत होते रामाला ! सुख व दुःख सारखीच मानण्याच्या ह्या वृत्तीला स्थितप्रज्ञता म्हणतात. अन् अशा स्थितप्रज्ञ माणसांनाच लोकोत्तर व्यक्ती–सर्वसाधारण माणसांपेक्षा काहीतरी अधिक–म्हणून गौरविले जाते.

पुढे दैवाला पंचवटीतील रामसीतेचे हे समाधानी जीवन जणू पाहवले नाही. विनाशकाल—नाशाचा काळ—जवळ आला की बुद्धी फिरते ह्या न्यायाने रामाला कांचनमृगाच्या पाठीमागे धाडण्याचा मोह सीतेला पडला. आणि त्याच्या गैरहजेरीचा गैरफायदा घेऊन रावणाने सीतेचे हरण केले.

केवढा कठिण प्रसंग होता हा ! वनवासात आलेल्या रामापाशी कसले तरी बळ होते का ? पण तो धीर वीर गडबडला नाही. त्याने सरळ लंकेवर स्वारी करण्याचे ठरविले. अन् त्याचे मदतनीस कोण ! तर वानरसैन्य ! परंतु ह्या वानरसैन्याच्या मदतीनेच राम विजयी झाला !

व्यवस्थित व भरपूर सैन्य आणि युद्धसामुग्री हाताशी असली तर कोणीही लढाई जिंकेल; पण दुबळे वानरसैन्य नि अपुरी युद्धसामुग्री ह्यांच्या जोरावर रामाने जय मिळविला हे खरे भूषणास्पद !

घरी शिकवायला रोज मास्तर येत असल्यामुळे तुम्ही परिक्षेत छान पास झालात तर त्याचे तितकेसे कौतुक नाही; पण अशी खासगी शिकवणी नसताना स्वतः व्यवस्थित अभ्यास करून, जे कळत नसेल ते वडील माणसांना किंवा वर्गशिक्षकाला विचारून घेऊन आपले कच्चे विषय सुधारून तुम्ही नुसते पास झालात तरी ते फार कौतुकास्पद आहे ! कारण त्यामुळे तुमच्या अंगातील हुषारीची पारख होते. असो.

श्रीरामाने सोन्याची लंका जिंकली. पण तिचा लोभ न धरिता त्याने ती विभीषणाच्या स्वाधीन केली. हा निर्लोभीपणा त्याच्या शौर्याला शोभाच देतो.

बरे, ज्या सीतेला सोडविण्यासाठी त्याने एवढे साहस केले ती सीता रावणाच्या बंदीत होती ह्यावरून प्रजेतील एका माणसाने रामाला टोमणा मारला. तो ऐकून श्रीरामाने सीतेचा त्याग केला! त्यावेळी त्याला किती दुःख झाले असेल ? पण अशा रीतीने तिचा त्याग करणे हे आपले कर्तव्य आहे अशी खात्री वाटल्यामुळे त्याने आपले मन एवढे कठोर केले.

आणि सीतामाईही त्याला शोभेशीच पत्नी होती. पतीने केलेला हा कर्तव्यकठोर निश्चय तिनेही मानला.

आपण आता पुष्कळ सुधारलो, शहाणे झालो असे वाटते आपल्याला. त्या मानाने आपले पूर्वज अगदी मागासलेले होते असेच समजतो आपण. पण खरे म्हणजे, त्या काळी कर्तव्य, न्याय, प्रेम, आदर वगैरे भावना त्या लोकांच्या अंतःकरणात किती जागृत असत! नि त्यामुळेच त्या काळी खरेखुरे रामराज्य होते. त्या काळच्या लोकांना इंग्रजी भाषा येत नव्हती, ते बूट, पाटलोण घालीत नव्हते, टेबल खुर्च्या वापरीत नव्हते. पण म्हणून ते सुधारलेले नव्हते असे म्हणणे चुकीचे होईल! सुधारणेचे हे स्वरूप निव्वळ बाह्य भपक्याचे आहे. खरी सुधारणा आचारांची व उच्चारांची असते. नि ह्या बाबतीत ते लोक किती तरी थोर होते. त्यांची बुद्धी प्रगल्भ होती, विचार उच्च होते नि हेच खरे महत्त्वाचे! त्या काळच्या पद्धतीप्रमाणे ते वागत, बोलत, अन् त्यांची खरी पारख करावयाची तर त्या काळच्या रीतीभातींचीच कसोटी लावावयाला हवी! आजच्या रीतिरिवाजांवरून त्यांची परीक्षा करणे चुकीचे आहे!

तुम्हां मुलांच्या वागण्या-बोलण्याची, शारीरिक वाढीची तुलना इंग्लंड, अमेरिका, रशिया वगैरे पुढारलेल्या देशांतील मुलां-बरोबर जर केली तर त्या तुलनेत तुमचे पारडे साहजिकच हलके ठरणार. म्हणजे तुम्ही खरोखरीच सर्व बाबतीत मागासलेले आहात असे धरावयाचे काय ?

तुम्ही हे लक्षात ठेवा की, ज्या दोन वस्तूंची वा व्यक्तींची तुलना करवयाची असते त्या एका पातळीवरील हव्यात. आंबे आणि रुपये ह्यांची बेरीज करता येते का कधी ? तसेच आहे !

**तेजस्वी सीतामाई**

बरं, ह्यापुढील रामकथा तुम्हांला ऐकून, वाचून, निदान रामराज्य, रामायण वगैरे बोलपट पाहून थोडीफार ठाऊक असेल. पण श्रीरामाच्या जीवनातील शेवटचा काही भाग तुम्ही कधी ऐकला असेल असे वाटत नाही म्हणून तो आता सांगते हं.

वाल्मिकीच्या आश्रमात जन्मलेले लव आणि कुश आपलेच मुलगे आहेत हे त्यांच्या तोंडून वाल्मिकीरामायण ऐकल्यानंतर रामाला कळले. त्याने लवकुशांना पोटाशी धरले व सीतेचा स्वीकार करण्याकरिता तिला आश्रमातून बोलावून आणले. त्या-वेळी आपले आचरण पूर्णपणे शुद्ध व पवित्र आहे अशी सर्वांची खात्री पटविण्यासाठी सीतेने पुढीलप्रमाणे शब्द उच्चारले, "माझ्या-कडून कायेने, वाचेने किंवा मनाने कोणतेही वाईट कृत्य घडले नसेल तर ही पृथ्वी मला पोटात घेवो."

नि तिने असे म्हणताच पृथ्वी दुभंग झाली व सीता तीत गडप झाली !

मुलांनो, विशेषतः मुलींनो, पाहिलेत ना सीता किती तेजस्वी होती ते ! तिने आपले कर्तव्य उत्तम रीतीने पार पाडले होते.

नवऱ्याने वनवासाची शिक्षा दिली ती तिने निमूटपणे मान्य केली. पुढे मुले झाली. वाल्मिकीसारखा पाठीराखा व गुरू त्याना लाभला; पण तेवढ्याने सीतेचे मातृकर्तव्य पार पडले नव्हते. आपली मुले त्यांच्या वडिलांच्या स्वाधीन केल्यावरच ती कर्तव्यमुक्त झाली. अन् इतक्या उशिरा का होईना, पण श्रीरामचंद्र तिला परत आपली पत्नी म्हणून मानू इच्छित होता. पण सीता मानी होती. तिला आता श्रीरामाच्या पत्नीपदाची आवड नव्हती. तिला एकच इच्छा होती नि ती म्हणजे संपूर्ण सीताशुद्धी व्हावी. सीता खरोखरीच शरीराने, वाचेने व मनाने पवित्र होती, हे सगळ्या लोकांना पटावे. अन् म्हणून श्रीरामाच्या राज्ञीपदाचा, त्याच्या अर्ध्या सिंहासनावर बसण्याच्या मानाचा लोभ तिला वाटला नाही. तिने स्वत:ची शुद्धता सर्वांना पटविली व हेच तिला गौरवास्पद वाटले.

खरोखर स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या अंगात असा तेजस्वी बाणेदारपणा हवा. ज्यांची वृत्ती अशी तेजस्वी असते त्यांना शरीराला ऐषआराम देणाऱ्या गोष्टींची पर्वा वाटत नसते. सीतेच्या चरित्रावरून आपण हा बोध घ्यावयाला हवा. तिच्या ह्या तडफदार पण विनयशील वागणुकीमुळे सीता ही मुलींना आदर्शभूत बनली आहे. सीतेला स्वतंत्र अस्तित्व, स्वतंत्र थोरवी प्राप्त झाली आहे. निव्वळ श्रीरामासारख्या थोर पुरुषाची पत्नी म्हणून नाही बरं तिला मान मिळत ! आपल्या पूर्वजांच्या पुण्याईवर, मोठेपणावर जगण्यात खरे भूषण नाही. त्यांचा मोठेपणा टिकवला पाहिजे, वाढवला पाहिजे.

हं. मग पुढे काय झाले ? सीता पृथ्वीच्या पोटात गेल्यावर रामाला फार खेद झाला. आता ह्यावर तुमच्या मनात अशी शंका येईल की, राम हा ईश्वराचा अवतार होता ना ? मग सीतेला

त्याने परत कशी आणली नाही ? आजकालच्या देवादिकांच्या व साधुसंतांच्या बोलपटांत असले कितीतरी चमत्कार आढळतात. मग श्रीरामचंद्राला हा चमत्कार नसता काय करता आला?

आला असता. पण, श्रीरामाने मानवी अवतार घेतला होता ना? आपल्यासारखाच एक माणूस म्हणून जन्म घेतला होता त्याने. आणि म्हणूनच वनवास, पत्नीचा त्याग वगैरे सर्वसाधारण संसारी माणसाप्रमाणे अनेक संकटे व दुःखे त्याच्यावर कोसळली. आणि त्याने ती शांतपणे सोसली. कारण त्याला तुमच्या आमच्यासमोर आदर्श ठेवावयाचा होता

अरे ! श्रीरामासारख्या ईश्वराच्या अवताराला इतके कष्ट सोसावे लागले नि त्याने ते धीराने सोसले. मग आम्ही नको का आमच्या वाट्याला आलेले दुःख व त्रास तशाच धीराने सोसावयाला ? असा विचार आपल्या मनात यावा व त्यामुळे आपल्या मनाला धैर्य व शांती मिळावी ह्या हेतूने श्रीरामचंद्राने सगळी संकटे झेलली. समजलं ना ?

अन् त्याने पुढे अनेक वर्षे उत्तम प्रकारे राज्य केले. त्यानंतर त्याने आता अवतारसमाप्ती करावी, अशी विनंती करण्याकरिता प्रत्यक्ष काल ( मृत्यू ) मुनीचे रूप धारण करून रामाकडे आला व मला आपणाकडे एकान्तात काही बोलावयाचे आहे असे रामाला म्हणाला. आणि ह्या गुप्त कानगोष्टीच्या वेळी जो कोणी तेथे येईल अगर त्या ऐकेल त्याला देहान्त शासन करावे असे ठरले. पण त्याच वेळी अत्यंत रागीट असे दुर्वास ऋषी तेथे येऊन आपणास आत्ताच रामास भेटवा; नाहीतर शापाने तुमचे सर्व कुळ नष्ट करीन, अशी धमकी घालू लागले. तेव्हा लक्ष्मणाने कुळनाशाऐवजी स्वतःचा नाश पत्करला आणि दुर्वास ऋषीची नि

रामाची भेट करविली. लक्ष्मणाने हे कृत्य स्वार्थासाठी केले नसल्यामुळे वधाऐवजी त्याला हद्दपारीची शिक्षा द्यावी, असा वसिष्ठ-ऋषींनी निकाल दिला. आणि लक्ष्मणाला हद्दपार करण्यात आले. पण आपल्या मातृभूमीबद्दल माणसाला एवढी आपुलकी वाटत असते की, मातृभूमीला दुरावण्याची ही शिक्षा लक्ष्मणाला असह्य झाली, अन् त्याने शरयू नदीत जलसमाधी घेतली. नंतर राज्याची नीट व्यवस्था करून रामचंद्र, भरत आणि शत्रुघ्न ह्यांनीही अशीच जलसमाधी घेतली.



श्रीरामचंद्राचे एकंदर चरित्रच अतिशय अद्‌भुतरम्य व बोधप्रद आहे. काही ठिकाणी चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत श्रीरामाचा उत्सव करतात. कारण, चौदा वर्षांचा वनवास संपवून रामचंद्र चैत्र शुद्ध प्रतिपदा या दिवशी अयोध्या नगरीत परत आले होते.

ह्यानंतर चैत्र महिन्यातला महत्त्वाचा दिवस म्हणजे महावीर-जयंती !

**महावीर-जयंती**


चैत्र शुद्ध त्रयोदशीला महावीर-जयंती येते. वर्धमान महावीर हे जैन धर्माचे थोर प्रवर्तक होत. महावीर-जयंतीच्या निमित्ताने

महावीरांच्या चरित्राचा अभ्यास करावा. इतरांच्या धर्मातील चांगली तत्त्वे आपण अवश्य आचरणात आणावीत. अशा रीतीने इतर धर्मांना मान द्यावा. यालाच परधर्म-सहिष्णुता म्हणतात.

परधर्माविषयी मनात अढी धरू नये. नेहमी आपले चांगले व इतरांचे चांगले ह्यांची सांगड घालावी. त्यामुळे आपल्या अंगातील माणुसकी वाढते.

### हनुमान-जयंती

आता ह्या नंतरचा सण म्हणजे हनुमान-जयंती. चैत्री पौर्णिमेच्या दिवशी हनुमान-जयंती असते. हनुमान ऊर्फ मारुती हा श्रीरामाचा निःसीम भक्त होता. अन् म्हणूनच प्रभू रामचंद्राच्या देवळासमोर मारुतीचे देऊळ बांधण्यात येते. शंकराचे वाहन नंदी



किंवा विष्णूचे वाहन गरुड ह्यांच्यापेक्षा मारुतीची योग्यता कितीतरी अधिक आहे. कारण मारुती हा केवळ रामाचा दास नव्हता. त्याने अनेकदा रामाला धीर दिला होता नि सल्लाही दिला होता.

मारुती हा बलशाली होता. त्याच्या बलाच्या अनेक कथा सांगतात. भीमही बलाढ्य होता. एकदा भीमाला आपल्या बळाचा फार गर्व झाला. काही कामासाठी तो बाहेर जावयास निघाला होता. अन् वाटेंत हनुमान आपले शेपूट पसरून बसलेला. भीमाने त्याला शेपूट उचलून घेण्यास सांगितले. त्यावर हनुमान म्हणाला, "भीमा, अरे, मी आता फार म्हातारा झालो आहे. हे अवजड शेपूट उचलण्याची शक्ती माझ्या अंगात नाही. तेव्हा तूच ते उचलून आपली वाट मोकळी करून घे ! " भीमाला आपल्या शक्तीची घमेंड होती. तो हनुमानाचे शेपूट उचलू लागला. पण छे: ! त्याला काही ते उचलता येईना. तेव्हा भीमाचा सपशेल गर्व हरण झाला.

पहा, हनुमानाच्या अंगी केवढे विलक्षण बळ होते. नि म्हणूनच त्याला तरुण मुलांची उपास्यदेवता म्हणतात. तालमीच्या आखाड्यापाशी हनुमानाची लहानशी देवळी तरी असतेच. तुम्ही म्हणाल, हनुमंत म्हणजे माकड ! माकडाला काय देवासारखा मान द्यायचा ?

पण त्या माकडाच्या अंगात गुणच तसे होते ना ? शक्तीचे तर झालेच; पण स्वामिभक्तीचा गुणही त्याच्या अंगी होता. नि म्हणून तो स्वतःला रामसेवक म्हणवीत असे. पण रामाने काही स्वतःला हनुमानाचा स्वामी मानले नाही. मग रामाला त्याच्याविषयी कोणती भावना वाटत होती ?

एकदा नारदालाही हीच शंका आली. स्वारी उठली नि सरळ रामाकडे निघाली. नारदमुनी म्हणजे सगळ्या जगाचे बातमीदार. दुसऱ्याकडून मिळालेल्या बातम्या त्यांच्या काय कामाच्या ? त्यांनी प्रत्यक्षच श्रीरामाची मुलाखत घेण्याचे ठरविले.

पण दारातच जरा घोटाळा झाला. द्वारपाल काही त्यांना आत जाऊ देईना. तो म्हणाला, " प्रभू रामचंद्र पूजेला बसले आहेत, ह्यावेळी आत जाता येणार नाही. पूजा संपू द्या. मग जा आत खुशाल. "

आश्चर्यचकित झालेले नारदमुनी विचार करू लागले. राम म्हणजे प्रत्येक्ष परमेश्वर! ब्रह्मदेव चारी वेद गाऊन थकला तरी रामरहस्य त्याला समजले नाही. समुद्रमंथनाच्या वेळी श्रीशंकर हलाहल विष प्याले तेव्हा रामनामानेच त्यांना शांती मिळाली. असे हे रामचंद्र पूजा तरी कोणाची करीत असावेत ?

नारदांना अपमानापेक्षा उत्सुकताच अधिक वाटली. एक एक पळ त्यांना युगासारखे वाटू लागले.

शेवटी एकदाची परवानगी मिळाली. नि नारद आत जाऊन पाहातात तर काय ? कितीतरी सुंदर सुंदर सोन्याच्या मूर्ती पुढचात ठेवून रामचंद्र आरती करीत आहेत. तेहतीस कोटी देव मानतात आपल्या हिंदु धर्मात. त्यांतले कोणते बरे असे हे देव की ज्यांची पूजा स्वतः प्रभू रामचंद्र करीत आहेत ? नारद डोळे ताणून ताणून पाहू लागले.

अरे, हे काय ? हा तर लक्ष्मण, हा भरत. आणि त्यांच्याही वर बसविला आहे तो कोण ? भक्तराज हनुमान ? आश्चर्य ! नारदांनी श्रीरामाची सहस्र नावे गायली होती, पण त्यांचे 'भक्ताचा भक्त' हे नाव त्यांना अजून कळले नव्हते. एवढी योग्यता होती बरं त्या वानराची! वानरच तो ! वा नर—म्हणजे जवळजवळ नरच किंवा माणूसच !

डार्विन नावाच्या संशोधकाने उत्क्रान्तिवाद सांगितला आहे. त्याप्रमाणे पाहिले तर माकडे—वानर—आपले पूर्वज होते.

तेव्हा आपण मारुतीला दैवत मानण्यात काही कमीपणा नाही. अन् म्हणून हनुमान-जयंतीच्या मुहूर्तावर तुम्ही नियमित व्यायाम घेण्यास प्रारंभ करा. तुम्ही आधीपासूनच व्यायाम करीत असलात तर उत्तमच ! अन् ह्या दिवशी खेळांचे सामने ठेवा. आपली शक्ती वाढविण्याचा प्रयत्न करा.

प्राचीन काळी वैभवाच्या शिखरावर असलेल्या ग्रीस, अथेन्स, स्पार्टा इत्यादी राज्यांत शारीरिक शिक्षणाला फार महत्त्व होते. शक्तिसामर्थ्याच्या स्पर्धा घडवून आणण्यासाठी तिथे 'ऑलिंपिक' सामने भरविले जात. हे 'ऑलिंपिक्' सामने हल्लीसुद्धा चालू आहेत. त्यांत भाग घेण्यासाठी देशोदेशीचे लोक जमतात. आपल्या भारतातील वज्रदेही तरुणांनीसुद्धा भाग घेऊन यश मिळविले आहे. 'अखिल भारतीय शारीरिक-शिक्षण-मंडळ' अशा संस्थांच्या मार्फत आपल्या भारतात देखील अशा प्रकारचे सामने होतात. पण त्याचा नीट फायदा घेतला जात नाहीं. तेव्हा हनुमंताचे चरित्र वाचून तुम्हाला नियमित व्यायाम घेण्याची आवड उत्पन्न होऊ द्या.

अन् आपल्या शारीरिक बळाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करावयाचा. लोकांना त्रास देत सुटावयाचे नाही किंवा गर्वही करावयाचा नाही. समाजात जे मवाली असतील त्यांच्या मस्तीला मात्र आळा घालावयाचा.

आणि हनुमान एवढा शक्तिमान् का होता ते ठाऊक आहे का तुम्हांला? तो नुसतेच सप्पाटून खात नव्हता काही. पुष्कळ खाण्यामुळे शक्ती येते असे नाही. तर योग्य व सात्त्विक खाणे हवे. भाजीपाला नियमितपणे खावयाला हवा. सर्व जीवनसत्त्वे भरपूर मिळतील असा आहार खाल्ल्यानेच शक्ति वाढते. त्यासाठी टमाटे, गाजर, मुळे, पालेभाज्या वगैरेची कच्ची कोशिंबीर खावी.

अशा रीतीने व्यवस्थित चौरस आहार व व्यायाम घेतल्याने तुमचे शरीर निरोगी बनेल ! आणि शरीर निरोगी तर मन निरोगी !

## मोरोपंतांची पुण्यतिथी

ह्या हनुमानजयंतीलाच मोरोपंत कवीची पुण्यतिथी येते. पुण्यतिथी म्हणजे ज्या दिवशी मृत्यू झाला ती तिथी.

मोरोपंत हे फार मोठे कवी होऊन गेले. त्यांनी पुष्कळ कविता केल्या आहेत. केकावली ह्या नावाची ईश्वराची प्रार्थना त्यांनी रचली. आपण मोरोपंत म्हणजे 'मोरपक्षी' अशी कल्पना त्यांनी केली. आणि म्हणून देवाच्या ह्या प्रार्थनेला केकावली हे नाव दिले. कारण मोराच्या ओरडण्याला केका म्हणतात. अन् आवली म्हणजे ओळी. तेव्हा त्यांनी जो देवाचा धावा केला त्याला हे नाव योग्यच दिसते.

महाराष्ट्रात पुष्कळ कवी झाले. पण त्या सर्वांमध्ये मोरोपंतांची कविता फार व्याकरणशुद्ध आहे. आणि त्यांच्या कवितेची भाषाही रसाळ आहे.

त्यांनी दामरामायण ह्या नावाची मोठी मजेदार कविता केली आहे. ह्या कवितेतील प्रत्येक ओळीतील शेवटला शब्द पुढच्या ओळीच्या सुरुवातीला घेतला आहे. त्यामुळे फार गंमत वाटते.

दाम ह्याचा अर्थ हार. फुले एकात एक गुंफून त्यांचा हार करितात. त्याप्रमाणे प्रत्येक ओळीतील शेवटली तीन अक्षरे त्यांनी पुढल्या ओळीत गुंफली आहेत. नि जणू हारच तयार केला आहे. उदाहरणार्थ–

श्रीपति झाला दशरथसुत राम दशाननासि **माराया** ।
**मा राया** जनकाची होय सुता त्रिजगदाधि **साराया** ।।
**सारा या** प्रभुची हे लीला गाती सदैवही **सुकवी** ।
**सुकवी** भवजलनिधिते निरुपमसुख रसिकजनमनी पिकवी ।।

अर्थातच ह्यावरून मोरोपंतांच्या बुद्धीची चमक दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांनी 'परंतु रामायण' ही लिहिले आहे. रामायणाची गोष्ट त्यांनी कवितेत सांगितली आहे. ती सांगताना प्रत्येक आर्येत त्यांनी 'परंतु' हा शब्द घातला आहे. उदाहरणार्थ,

मातलि म्हणे 'रघुपते' शत्रुवरि पितामहास्त्र सोडावे ।
वज्रा भेद्य **परंतु** द्विषदुर एणे पळात फोडावे ।।
विध्यस्त्रे अभिमंत्रुनि विधिरचित शरे उरःस्थळी ताडी ।
नव्हता पडत **परंतु** प्रभू उर भेटूनि दशमुखा पाडी ।।

अशा रीतीने वेगवेगळ्या तऱ्हेच्या कविता करणे सोपे नाही. त्याला चिकाटी लागते आणि एकाच अर्थाचे पुष्कळ शब्द ठाऊक असावे लागतात. कष्टाशिवाय फळ मिळत नसते बरं !

तुम्हांला कवी होण्याची आवड असली तर अशा कवीचे काव्य पुष्कळ वाचा. ते पाठ करा. त्याचा अभ्यास करा. म्हणजे तुमच्या अंगात काव्य करण्याची शक्ती असली तर तिची हळूहळू वाढ होईल !

**बाळाजी विश्वनाथ पेशवे**

मराठेशाहीतील हा राजकारणी पुरुष चैत्र महिन्यात मरण पावला. हा मूळ कोकणातील श्रीवर्धन गावचा. पुढे तो घाटावर आला. आणि अंगातील हुषारीमुळे हा पुणे प्रांताचा सरसुभेदार झाला. छत्रपती शाहू महाराजांची ह्याच्यावर फार मर्जी होती.

बाळाजी वसुलीचे काम पहात असे. पण मोंगल सेनेशी तोंड देण्याचा प्रसंग आला तर मराठ्यांकडे भरपूर फौज हवी हे त्याच्या ध्यानात आले. म्हणून त्याने मराठ्यांची सेना वाढविण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. त्याबद्दल शाहूने ह्याला 'सेनाकर्ते' ही पदवी दिली. आणि गरज लागल्यावेळी दिल्लीचा बादशहासुद्धा मराठा सेनेची मदत मागू लागला. बाळाजीच्या प्रयत्नांमुळे मराठ्यांना हे महत्त्व मिळाले.

बाळाजीने राज्यकारभाराची व्यवस्थाही उत्तम लावून दिली. शिवाजी महाराजांच्या वेळी राज्यकारभार आठ हुषार इसमांच्या हाती सोपविण्यात येई. आणि ह्या आठ इसमांना अष्टप्रधान म्हणत. पण आता अष्टप्रधानांची पद्धत नाहीशी झाली. व पेशव्यांच्या हातात सर्व सत्ता आली. आणि बाळाजीने राज्याची सर्व व्यवस्था छान राखली.

बाळाजीला दोन मुलगे होते. ते दोघेही त्याच्याप्रमाणेच कर्तबगार होते. बाजीराव हा वडील मुलगा होता. त्यामुळे बाळाजीच्या मागून तो पेशवा झाला. इतिहासात थोरले बाजीराव ह्या नावाने तो प्रसिद्ध आहे. धाकटा मुलगा चिमाजीआप्पा. हा फार पराक्रमी व सुस्वभावी होता.

बाळजीने स्वतःला मोठेपणा व हुद्दा मिळविलाच; पण आपल्या संबंध भट घराण्यालाही मोठेपणा आणला. आणि आपल्या मुलाला व नातवाला वगैरेना पिढीजाद पेशवाई मिळवून दिली. हे खरे कर्तृत्व ! असा हा कर्तबगार बाळाजी पुण्याजवळील सासवड गावी एकाएकी मरण पावला. तिथे ह्याची आठवण म्हणून तुळशी-वृंदावन स्थापन केले आहे.

ह्या महिन्यात श्रीराम व हनुमान ह्यांच्या चरित्रापासून तुम्ही उत्तम बोध आणि स्फूर्ती घ्या. मोरोपंत कवी ह्यांच्या कविता वाचून वाङ्मयाची आवड लावा स्वतःला. एकंदरीत चैत्र मासातील सणांची आणि थोर लोकांच्या जयंती–पुण्यतिथींची ही माहिती वाचून तिचा नेहमी मनाशी विचार करा अन् वर्षाचा आरंभच तुम्ही असा छान केलात की, सबंध वर्ष खात्रीने सुरेख जाईल ! कारण 'प्रारंभ उत्तम जमला की अर्धे यश पदरात पडले' अशी इंग्रजी म्हण आहे!

त्यातून ह्या चैत्र महिन्याचा प्रारंभच मुळी साडेतीन मुहूर्तातल्या एका मुहूर्तावर गुढीपाडव्याला झालेला ! मग ह्या दिवशी अन् ह्या महिन्यात केलेले बेत यशस्वी होतील ह्यात काय शंका ! पण तसे कशाला ? तुम्ही प्रत्यक्ष अनुभवच घ्या बघू. हं. रोजनिशी घ्या हातात नि टिपून ठेवा सगळा बेत यात! –

चैत्रमासाची ही माहिती आवडली ना तुम्हांला? मग आता पुढला वैशाख मास ! –

## स्वाध्याय

१. साडेतीन मुहूर्त कोणते? त्यांत गुढीपाडव्याचे महत्त्व काय ते सांगा.
२. प्रभू रामचंद्राच्या कोणत्या गुणांबद्दल तुम्हांस आकर्षण वाटते? का?
३. भीमाचा गर्व मारुतीने कसा हरण केला? रामाला ' भक्ताचा भक्त ' असे का म्हटले आहे?
४. सीतेच्या चरित्रावरून तुम्ही काय बोध घ्याल ?
५. पुढील व्यक्तीविषयी थोडक्यात माहिती सांगा :—
(अ) मोरोपंत, (ब) बाळाजी विश्वनाथ.